अर्थ

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

*वर्गणीचे दर :*

वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.

किरकोळ अंक : ४ आ.

*जाहिरातीचे दर :*

कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.

चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ताः–

" अर्थ "

" *दुर्गाधिवास* " पुणें ४.

REGISTERED No. B. 3434

# अर्थ

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख २७ जुलै, १९४९ | अंक ३०

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

फोन नं. २४८३ | तारेचा पत्ता " Cencobank " | पोस्टबॉक्स नं. ५११

मुख्य कचेरीः–लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

–ः शाखा ः–

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—ःबँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

## सारस्वत
## को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[ स्थापना १९१८ ]



सारस्वत बँक बिल्डिंग, मुंबई ४ · टे. नं. ३१६७५

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ४,२५,००० |
| रिझर्व्ह | ... | रु. १,६५,००० |
| ठेवी | ... | रु. ८८,५१,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. ९६,५१,००० |

बचतीच्या आकर्षक योजना

सब–ऑफिस : —दादर— ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

वा. पुं. वर्दे, बी. कॉम्., अध्यक्ष.
शं. वि. संझगिरी, बी. कॉम्., सेक्रेटरी.

पाडव्याच्या सुमुहूर्तावर बँकेची शाखा मार्केट बेळगांव येथें श्री. शं. वि. संझगिरी, बी. कॉम्., सेक्रेटरी यांच्या देखरेखीखालीं सुरू झाली आहे.

## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखाः–९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. –एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.– ब्रँच सेक्रेटरी

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

## सर्व प्रसिद्ध माल

भिंतीला लावण्याचे रंग, छापण्याची शाई,
एनॅमलचे कच्चे व पक्के रंग

केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें २ | केळकर बंधू, (शाखा) मेनरोड, नाशिक.

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)


## विविध माहिती

**आंतरराष्ट्रीय चलन निधीची कचेरी**—आंतरराष्ट्रीय चलन-निधीची एक प्रादेशिक कचेरी मुंबई येथें उघडण्यांत आली आहे. निधीचे पूर्वेकडील देशांत जे सभासद आहेत त्यांत चीन, हिंदुस्थान आणि सयाम हे देश आहेत. पाकिस्तान लवकरच सभासद होईल असा अंदाज आहे. ह्या निधीकडून सभासद-राष्ट्रांनीं आतापर्यंत ७२·५ कोटी डॉलर्स (२४२ कोटी रुपये) कर्ज घेतलेलें आहे. सभासद-राष्ट्रांचें चलन अगर सोनें ह्यांच्या स्वरूपांत निधीची जिंदगी ८०० कोटी डॉलर्स आहे. पॅरीस आणि कैरो येथें निधीच्या आणखी दोन प्रादेशिक कचेऱ्या आहेत.

**संरक्षण देण्यांत भेदभाव नाहीं**— हिंदमधील उद्योगधंद्यांतून परकीय भांडवल गुंतविण्यांत येत आहे अगर आलेलें आहे. मोटारींना लागणाऱ्या बॅटरीच्या धंद्यांतही कांहीं परकीय भांडवल गुंतलेलें आहे. परकीय कंपन्यांचा विस्तार वाढूं लागल्यामुळें ह्या देशी धंद्याला अधिक संरक्षण यावें अशी मागणी करण्यांत येत होती. परंतु हिंद सरकारनें एक पत्रक काढून असें जाहीर केलें आहे कीं, एखाद्या धंद्याला संरक्षण दिलें गेल्यावर त्या धंद्यांतील सर्व कारखान्यांना त्याचा फायदा मिळेल. हिंदी भांडवलाच्या मालकीच्या अगर परकीय मालकीच्या, असा भेदभाव करतां येणार नाहीं.

**आर्थिक प्रगतीची मंद गति**— संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या आशिया-आर्थिक कमिशननें आपला दुसरा अहवाल तयार केला आहे. आशिया आणि अति पूर्वेकडीलें देश ह्यांमधून दारिद्र्य पसरतच चालल्याचें नमूद करून, त्या त्या देशांतील सरकारांनीं हें दारिद्र्य नाहींसें करण्याचा प्रयत्न करावा अशी विनंति अहवालांत करण्यांत आलेली आहे. कमिशनचे चिटणीस डॉ. लोकनाथन ह्यांनीं अहवालाचें सार थोडक्यांत असें सांगितलें आहे :–" युद्ध संपून जवळ जवळ ४ वर्षें झालीं आहेत. परंतु आशियांतील देशांची आर्थिक पुनर्घटना अत्यंत मंदगतीनें चालू आहे. रबराचें उत्पादन सोडून इतर औद्योगिक आणि शेतीचें उत्पादन असमाधानकारकच राहिलें आहे. आशियांत अजूनही अन्नधान्याची आयात करावी लागते."

**पुणें नगरपालिकेच्या उत्पन्नांत वाढ**—मुंबई सरकारनें पुणें नगरपालिकेला आपल्या हद्दींत येणाऱ्या मालावर त्याच्या किंमतीवर आधारलेली जकात घेण्याची परवानगी दिली आहे. ह्यामुळें नगरपालिकेचें जकातीचें उत्पन्न ५,००,००० रुपयांवरून १३,००,००० रुपयांवर जाईल. त्याचप्रमाणें, घरपट्टीच्या आकारणींतही ९ टक्क्यांच्या ठिकाणीं १५ टक्के आकारणी करण्याचे अधिकार देण्यांत आले आहेत. वाढलेल्या आकारणीमुळें घरपट्टीचें उत्पन्न ५,००,००० रुपयांनीं अधिक येईल. पुणें कॉर्पोरेशनचें क्षेत्रफळ ६१ चौरस मैल होईल. पुण्यांतील सध्याच्या चार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारांत २४ चौरस मैल जागा आहे. मुंबई कॉर्पोरेशनचें अधिकार-क्षेत्र २८ चौरस मैलच आहे.

## सहयोग : सहकारी उद्योगांची मासिक पत्रिका

औद्योगिक सहकारी मंडळ्या, त्यांचे संघ व मुंबई प्रांताच्या सहकारी खात्यांतील औद्योगिक सहकारी विभाग यांची प्रगति 'सहयोग' द्वारां करण्याचें प्रॉ. इं. को. असोसिएशननें ठरविलें आहे. सहकारी चळवळींतील वेगवेगळ्या घटकांत निकटचे संबंध निर्माण करण्याचा दुवा म्हणूनही 'सहयोग'चा उपयोग होणार आहे. इतर प्रांतांतील व देशांतील औद्योगिक सहकारी संस्थांच्या उन्नतिबद्दल माहिती, औद्योगिक सहकारी संस्थांतील कार्यकर्त्यांना आवडण्याजोग्या तंत्रविषयक व व्यापारविषयक सूचना आणि प्रसिद्ध सहकारी कार्यकर्त्यांचें मार्गदर्शन वाचकांपुढें ठेवण्याचा त्यांत प्रयत्न केला जाणार आहे. मुंबई प्रांताच्या अर्थ, सहकारी संस्था व ग्रामोद्योग या खात्याचे मंत्री श्री. वै. ल. मेहता यांनीं जिल्हा औद्योगिक सहकारी संघांच्या व प्रांतिक सहकारी संस्थांच्या शाखांच्या प्रतिनिधींच्या सभेंत १४-५-४९ रोजीं एक विचारप्रवर्तक भाषण केलें. ह्या अग्रगण्य सहकारी कार्यकर्त्यांच्या भाषणानें पत्रिकेच्या पहिल्या अंकाला (जून १९४९) आरंभ व्हावा, हें योग्यच आहे.

(संपादकः-श्री. एल. एन्. रेणु, प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को. असोसिएशन लि., ९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.)

**पूना इलेक्ट्रिकच्या भांडवलांत वाढ**

दि पूना इलेक्ट्रिक सप्लाय कं. लि. नें आपलें भांडवल ५० लक्ष रु. चें ६० लक्ष रु. करण्याचें ठरविलें आहे. (१०० रु. चे ५६,००० ऑर्डिनरी शेअर्स व १०० रु. चे ४,००० सात टक्के डिव्हिडंडचे क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स) रिझर्व्ह फंडांतील ४,८०,३०० रुपयांचे ४,८०३ ऑर्डिनरी शेअर्समध्यें रूपांतर करण्यांत येणार आहे.

**हिंदुस्थानला रशिआकडून धान्य**—हिंदुस्थान आणि रशिया ह्या दोन देशांतील चौथ्या व्यापारी करारावर लवकरच सह्या होतील. हिंदुस्थानला रशिआ गहूं देऊन त्या बद्दल ताग, चहा आणि लाख घेणार आहे. रशिआ २,००,००० टन गहूं आणि १,००,००० टन मका, बार्ली इत्यादी धान्य देणार आहे. हा करार ऐनजिनसी, देवाणघेवाणीच्या स्वरूपाचा नाहीं असें समजतें. परस्परांच्या विचारविनिमयानें किंमती ठरल्यावर रशिया धान्य देईल आणि हिंद सरकार रशिआला ताग, चहा आणि लाख ह्या वस्तू येथील बाजारांतून मिळवून देण्याची व्यवस्था करील.


अभ्यासूंची ज्ञानपिपासा भागविणारें, श्रमलेल्यांना उत्तमोत्तम ललितवाङ्मयरूपी मेजवानी देणारें, अभिरुचिसंपन्न

वर्ष ४ **हिंद मासिक** अंक ४थें

संपादक—न. मो. जोशी, एम्. ए.

'हिंद' चा येत्या १ ऑगस्टचा संग्राह्य

**लघुकथा-स्पर्धा विशेषांक**

वाचण्यास विसरूं नका. किंमत फक्त रु. १. यामध्यें उदयोन्मुख लेखकांच्या चुरचुरीत कथांची लयलूट आहे. वा. व. रु. ६ किं. अं. १० आणे.
एजन्सी न दिलेल्या गांवीं सढळ अटींवर एजन्सी देणें आहे.

'हिंद' कार्यालय, आंग्रेवाडी, मुंबई ४.

# अर्थ

बुधवार, ता. २७ जुलै १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र


## प्रांतिक बँकेच्या घटनेंत क्रांतिकारक बदल

मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या भागीदारांची एक स्पेशल जनरल सभा शनिवार, ता. ३० जुलै रोजीं भरणार असून तिचेकडे बँकेचे बायलॉज बदलण्याचें काम आहे. सबंध मुंबई प्रांतांतील सर्व लायक पतवाल्या शेतकऱ्यांना भांडवल पुरवठा करण्याची जबाबदारी पुनर्घटित प्रांतिक बँकेकडे येणार आहे आणि त्या दृष्टीनें पुनर्घटना करणारे बायलॉज वरील सभेंत मंजूर करण्यांत येतील.

### पुनर्घटनेची पार्श्वभूमि

प्रांतिक बँकेच्या पुनर्घटनेची पार्श्वभूमि खालील प्रमाणें आहे. प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या अध्यक्षतेखालीं नेमण्यांत आलेल्या "शेतकी अर्थव्यवहार" समितीनें ॲग्रिकल्चरल क्रेडिट कॉर्पोरेशनची व्यवस्था सुचविलेली होती. कोऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशननें त्याचा विचार करून, नियोजित कॉर्पोरेशनचें काम सध्याच्या सहकारी संघटनेंतच कांहीं दुरुस्त्या व सुधारणा करून तिचेमार्फत घडवून आणावें असा ठराव केला. ह्या ठरावास अनुसरून मुंबई सरकारनें सर मणीलाल नाणावटी ह्यांचे अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमून तिचेकडे तपशीलवार शिफारशी करण्याचें काम सोपविलें. प्रांतिक सहकारी बँकेस मध्यवर्ती मानून, पुढील व्यवस्था व कारभार करावा अशी त्या कमिटीची मूलभूत शिफारस होती. ही शिफारस आणि सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींनीं एकसूत्री कारभारास दिलेली साधारण मान्यता, ह्यांच्या आधारावर प्रांतिक सहकारी बँक व जिल्हा सहकारी बँका ह्यांची पुनर्घटना आतां करण्यांत येत आहे. ती मुंबई सरकारनें १२ मार्च १९४८ व २५ जून १९४८ ह्या दिवशीं प्रसिद्ध केलेले ठराव ह्यांचेवर आधारलेली आहे.

प्रांतिक बँकेचें अधिकृत भांडवल ५० लक्ष रु. करून तें १ कोटी रु. पर्यंत वाढविण्याची तरतूद करण्यांत आलेली आहे. प्रांतिक बँक ही मध्यवर्ती बँका व बँकिंग यूनियन्स ह्यांचे शेअर्स घेईल, आणि तेवढी रकम तिला प्रांतिक सरकारकडून मिळेल. त्याखेरीज, मध्यवर्ती किंवा प्रांतिक सरकारकडून प्रांतिक सहकारी बँकेस १ कोटी रुपयांचें शेअर भांडवल मिळूं शकेल. पांच वर्षांनीं हें भांडवल परत फेडतां येईल. ह्या भांडवलावर फक्त ३% डिव्हिडंडच सरकार प्रत्यक्ष घेईल; ज्यास्त दरानें जाहीर झालेल्या डिव्हिडंडची रकम बँकेच्या मालकीच्या "क्रेडिट स्टॅबिलायझेशन रिझर्व्ह" मध्यें वर्ग केली जाईल.

गाडगीळ कमिटीची मूळ शिफारस अशी होती कीं, सरकारी नियमित अशी पैसा पुरविणारी प्रांतिक संस्था अस्तित्वांत यावी व ज्या ठिकाणीं सहकारी चळवळ उच्च दर्जाला पोहोंचली असेल तेथेंच हें कर्ज पुरविण्याचें काम सहकारी चळवळीमार्फत व्हावयास हरकत नाहीं. गाडगीळ कमिटीच्या शिफारशीस मुरड घालून, सरकारनें आतां स्वतःचें भांडवल सुरक्षित राहून त्यावर ३% व्याज सुटावें आणि त्या बरोबरच प्रांतिक बँकेमार्फत, नियंत्रणाखालीं, शेतकऱ्यांना भांडवल पुरवठा व्हावा अशी व्यवस्था केली आहे. बँकेसहि व्याप वाढविण्यासाठीं जादा भांडवल सोइस्कर अटींवर मिळत आहे. सहाजीकच, ह्या वाढत्या जबाबदाऱ्यांस अनुसरून बँकेच्या बोर्डाच्या घटनेंत दुरुस्ती होणार आहे.

### बोर्डाची घटना व सुटसुटीत कारभाराची तरतूद

पुनर्घटित प्रांतिक बँकेच्या बोर्डावर ह्यापुढें खालील प्रमाणें डायरेक्टर काम करतील. (अ) ज्या बँकांनीं बायलॉजमध्यें तरतूद करून प्रांतिक बँकेचे तपासणीचे अधिकार मान्य केले असतील व ज्यांनीं स्वतःच्या वसूल भाग भांडवलाच्या ५% इतके प्रांतिक बँकेचे भाग घेतले असतील, अशा प्रत्येक जिल्हा मध्यवर्ती बँकेचा प्रतिनिधी. (आ) जेथें प्रांतिक बँक मध्यवर्ती बँक म्हणून काम करते, अशा सात जिल्ह्यांतील शेतकी पतपेढ्यांचे सात प्रतिनिधी व इतर जिल्ह्यांतील शेतकी पतपेढ्यांचे तीन प्रतिनिधी. (इ) बँकिंग यूनियन्स व भांडवल पुरविणाऱ्या इतर संस्था ह्यांचे दोन प्रतिनिधी. (ई) मुंबई प्रां. स. मार्केटिंग सोसायटीचा एक प्रतिनिधी. (उ) स्वतःच्या वसूल भाग भांडवलाच्या ५% इतके प्रांतिक बँकेचे भाग ज्यांनीं घेतले असतील अशा अर्बन बँकांचे चार प्रतिनिधी, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक व मुंबई ह्यांचा प्रत्यकीं एक. (ऊ) व्यक्तिगत भागीदारांचे पांच प्रतिनिधी. (ए) प्रांतिक सरकारनें नियुक्त केलेले तीन प्रतिनिधी, त्यांपैकीं एक बँकिंग अथवा आर्थिक तज्ञ. (ऐ) अधिकारपरत्वें एक मॅनेजिंग डायरेक्टर.

सुमारें ३४ डायरेक्टरांचें हें बोर्ड सहाजीकच कामाच्या दृष्टीनें आटोपशीर होणार नाहीं. (सध्यां बँकेच्या बोर्डावर १५ डायरेक्टर असून त्यांपैकीं ७ भागीदारांचे व ८ सहकारी संस्थांचे प्रतिनिधी आहेत.) त्यासाठीं ९ ते १२ डायरेक्टरांची कार्यकारी कमिटी नेमली जाईल. चेअरमन, मॅ. डायरेक्टर, सरकारनियुक्त एक डायरेक्टर आणि बार्डानें निवडलेले इतर डायरेक्टर (पैकीं तिघे मध्यवर्ती बँका व बँकिंग यूनियन्स ह्यांचे प्रतिनिधी असतील व त्यांत महाराष्ट्र, कर्नाटक व गुजरात ह्या प्रत्येकाचे वाट्यास एक प्रतिनिधी येईल.) ह्यांचा ह्या कमिटींत समावेश होईल. ही कार्यकारी कमिटी चेअरमन, मॅनेजिंग डायरेक्टर व जास्तींत जास्त तीन इतर डायरेक्टर ह्यांची एक सब कमिटी नेमून तिला आपले अधिकार देऊं शकेल. कर्जाच्या अर्जाचा सत्वर विचार व्हावा व तीं लवकर दिलीं जावीं ह्या दृष्टीनेंहि कारभार सुलभ होण्यासाठीं तरतूद करण्यांत आली आहे. बोर्डानें नेमलेल्या कार्यकारी कमिटीनें नेमावयाच्या सबकमिटीकडेच बोर्डाचे खरे अधिकार व्यवहारतः येतील, हें उघडच आहे.

---

**टाटा कंपनीचें डिव्हिडंड कायम**—टाटा आयर्न अँड स्टील कं. लि. चे ३१ मार्च १९४९ अखेरचे हिशेब पुरे करून तिच्या डायरेक्टरांनीं ऑर्डिनरी शेअरवर १४ रु. व डिफर्ड शेअरवर ६४ रु. १५ आ. डिव्हिडंड सुचविलें आहे. दोन्ही डिव्हिडंड करमाफ आहेत.

## मुंबई प्रां. सहकारी बँकेचें परिचय पुस्तक

मुंबई प्रांतिक सहकारी बँकेची लवकरच पुनर्घटना होऊन तिच्या स्वरूपांत व कार्यक्षेत्रांत आणि जबाबदाऱ्यांत महत्त्वाचे फरक होत आहेत. बँकेचा संक्षिप्त इतिहास व तिचें सध्याचें कार्य ह्यांची माहिती देणारें एक लहानसें ४१ पृष्ठांचें पुस्तक बँकेनें तयार केलें आहे, तें ह्याच वेळीं प्रसिद्ध होत आहे, हें एका दृष्टीनें उचितच आहे. आकडे, तक्ते, नकाशे, इत्यादींच्या सहाय्यानें पुस्तकांतील माहिती मनोरंजक व उद्बोधक करण्यांत आली आहे. पुस्तकांत बँकचा १९४७–४८ सालविषयक तपशीलवार अहवाल दिला आहे. ( नेहमीं भागीदारांकडे पाठवितात, तो नव्हे. ) त्यावरून तिच्या व्यापाची व ती करीत असलेल्या उपयुक्त कार्याची उत्कृष्ट कल्पना येते. प्रांतिक सहकारी बँक व प्रांतांतील सहकारी चळवळीची प्रगति ह्यांचें नातें अत्यंत निकटचें आहे आणि मुंबई प्रांतांतील स्वार्थत्यागी, नामवंत व तज्ञ सहकारी पुढाऱ्यांचें नेतृत्त्व प्रांतिक बँकेस सतत लाभलें आहे. त्यामुळें, तिचेकडे सहकारी प्रेरणेचें व चळवळीचें पुढारीपण आपोआपच आलेलें आहे. शेतकी सोसायट्यांना भांडवल पुरविण्यासाठी मध्यवर्ती बँक स्थापन करण्याच्या, सर विठ्ठलदास दा. ठाकरसी व सर लल्लुभाई सामळदास ह्यांच्या कल्पनेचें मूर्त स्वरूप म्हणजेच १९११ सालीं नोंदण्यांत आलेली बॉंबे सेंट्रल को. बँक ही होय. बॉंबे अर्बन को. के. सोसायटीनें वेगवेगळया जिल्ह्यांत दिलेलीं कर्जें व सरकारनें निरा कालव्याखालील २९ गांवांत दिलेलीं तगाई कर्जें हीं ह्या बँकेनें स्वतःकडे घेऊन कामास प्रारंभ केला. जिल्हानिहाय मध्यवर्ती बँका पुढें स्थापन झाल्या व १९२४ सालीं प्रांतिक बँकेचें नांव, तिच्या केंद्रीय स्थानास अनुसरून, मुंबई प्रांतिक सहकारी बँक असें बदलण्यांत आलें. १९४८ अखेर तिच्या ४१ शाखा व १२ उपशाखा १० जिल्ह्यांतून काम करीत आहेत. शेतकी पतपेढ्यांना कर्जें देण्यापुरतेंच काम तिनें मर्यादित केलेलें नाहीं, हें तिच्या १९४७–४८ च्या विस्तृत अहवालावरून सहज लक्षांत येतें व बँकेच्या विविध उपयुक्त सेवेची कल्पना येते. बँकेच्या चालकांनीं जबाबदारीपूर्वक कारभार करून, संस्थेची मजबुती प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें वाढविली आहे आणि बँकेला स्वस्त दरानें ठेवी मिळाल्या त्याचा फायदा, व्याजाचा दर वेळोवेळीं उतरवून, सोसायट्यांना तिनें दिला आहे. प्रांतिक बँकेच्या नेतृत्वाचा फायदा प्रांतांतील सर्व सहकारी संस्थांना मिळाला आहे व मिळत आहे. अशा रीतीनें, सहकारी चळवळीची व शेतकऱ्यांची सर्वांगीण सेवा करीत असतांना, तिनें व्यावहारिक दृष्टि सोडली नाहीं; त्यामुळेंच आज तिच्या भागांस प्रत्येकीं ३६ रुपयांपर्यंत वाढावा मिळत आहे. बँकेच्या ह्या उत्कृष्ट स्थितीस ज्यांनीं ज्यांनीं हातभार लावला, त्यांचा उल्लेख पुस्तकांत करण्यांत आला आहे. बँकेचे पूर्वीचे मॅनेजिंग डायरेक्टर ( हल्लीचे अर्थ–सहकार मंत्री ) ह्यांनीं मध्यंतरींच्या अनेक अडचणींना तोंड देऊन निष्ठेनें, स्वार्थत्यागानें व आदर्श सेवा–तत्परतेनें, बँकेची घडी बसविण्याचें व तिचा उत्कर्ष घडवून आणण्याचें जें महत्त्वाचें कार्य दीर्घ काळ केलें, त्याचा गौरव प्रस्तुत पुस्तकांत अधिक तपशीलानें करण्यांत आला असता तरी तो वस्तुस्थितीला अपुराच पडला असता.

---

**उद्योग–विनिमय केंद्रें**—हिंद सरकारच्या मजूर खात्यानें ठिकठिकाणच्या उद्योग–विनिमय केंद्रांवर होणाऱ्या खर्चांत ४५ लाख रुपयांची कपात करण्याचें ठरविलें आहे. केंद्रांवर होणाऱ्या खर्चापैकीं ही रक्कम एक तृतियांश आहे. सरकारच्या एकॉनमी कमिटीनें हीं केंद्रें प्रांतिक सरकारांना चालविण्यास द्यावीं अशी शिफारस केली होती. परंतु तीं मध्यवर्ती सरकारच्याच ताब्यांत रहावीं असा निर्णय घेण्यांत आला आहे. ह्या केंद्रांवर सालिना १,४८,००,००० रुपये खर्च करण्यांत येत असतात.

**उत्कृष्ट पुस्तकांची निवड**—संयुक्त–राष्ट्र संघटनेच्या सांस्कृतिक संघटनेनें जगांतील १०० उत्कृष्ट पुस्तकें निवडून त्यांचें भाषांतर करण्याचें ठरविलें आहे. ह्या पुस्तकांत वाङ्मय, शास्त्र, तत्वज्ञान इत्यादी विषयांवरील पुस्तकांचा अंतर्भाव करण्यांत येणार आहे. प्रत्येक सभासद–राष्ट्रानें आपापल्या देशांतील उत्कृष्ट पुस्तकांची यादी तयार करावयाची आहे. त्यांतून निवड करण्यांत यावयाची आहे. ब्रिटिश सरकारच्या शिक्षण खात्यानें २३ ग्रंथकारांच्या पुस्तकांची एक यादी तयार केली आहे. परंतु ह्या यादींत १९ व्या शतकानंतर प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची नांवें नाहींत.


# SAFE AND SURE!

**OUR INSURANCE IS A SAFE AND SURE PROTECTION AGAINST UNFORESEEN DANGERS, SO CONSULT**

**WESTERN WILICO LTD. INDIA**

STRONGHOLD OF PROTECTION

Expertly sound advice will promptly be given. We have useful plans for all pockets. For insurance and representation please contact with

—: *Manager* :—

**Western India Life Insurance Co., Ltd.**

SATARA

*Poona Branch* :—179 Budhwar Peth, Laxmi Road, Poona 2.

## गेल्या वर्षांतील मशिनरीची आयात

( भा. म. काळे )

हिंदच्या परराष्ट्रीय व्यापारांत गेल्या वर्षी बरीच मोठी प्रतिकूल तफावत आली याचें एक कारण आयातीवरील निर्बंध सैल करण्यांत आले हें एक आहे. आयातीवरील निर्बंध सैल करण्यांत आल्यामुळें चैनीच्या अनावश्यक मालाचीहि आयात झाली. १९४८-४९ सालीं हिंदमध्यें यंत्रसामुग्रीची आयात ७६ कोटी, ६५ लक्ष रुपयांची झाली. ही आयात १९४७-४८ च्या आयातीच्या मानानें ५० टक्के जास्त झाली व एकंदर आयातीच्या १५ टक्के झाली. आतां मशिनरीच्या आयातीचें पृथःकरण करतांना असें दिसतें कीं २० कोटी रु. किंमतीची मशिनरी कापड गिरण्या, साखरेचे कारखाने, कागद, खाणी व चहा इ० बाबतींची असल्यामुळें तिच्यामुळें प्रत्यक्ष उत्पादनाची वाढ होण्याला मदत होणें शक्य आहे. परंतु बाकी ५६ कोटींची मशिनरी टाइप रायटर्स, मशीन टूल्स, मोटारी, तांदुळाच्या गिरण्या, शिवणकामाचीं यंत्रें इ० गोष्टींची असल्यामुळें प्रत्यक्ष उत्पादनाला ह्यामुळें विशेष प्रोत्साहन मिळेल असें नाहीं. कापड, साखर इ. कारखान्यांच्या मशिनरीची जी आयात झाली त्यामुळें गिरण्यांतील जीर्ण झालेलीं यंत्रें बदलून नवीं यंत्रें बसविण्यासाठी उपयोग करण्यांत आला असला पाहिजे. यामुळें प्रत्यक्ष उत्पादन वाढण्याला फार मदत झाली असें म्हणतां येत नाहीं. गेल्या चार वर्षांतील सर्व मोठ्या धंद्यांतील उत्पादनाचे आंकडे विचारांत घेतले असतांहि गेल्या वर्षांत उत्पादन विशेष रीतीनें वाढलें आहे असें म्हणतां येत नाहीं. फार तर सिमेंट व पोलाद यांच्या उत्पादनांत म्हणण्यासारखी वृद्ध झाली. विजेचे दिवे, ट्रॅन्स्फॉर्मर्स, अलॉइज यांच्या उत्पादनांत थोडीशी वाढ होत आहे. दुसरी एक विचार करण्यासारखी गोष्ट म्हणजे तागाच्या गिरण्यांना लागणाऱ्या मशिनरीच्या आयातीमुळें उत्पादनांत वाढ होणें आजच्या परिस्थितींत मुळींच शक्य नाहीं. कारण, सध्यां अस्तित्वांत असलेल्या यंत्रसामुग्रीचाहि भरपूर उपयोग केला जात नाहीं. तागाच्या गिरण्यांना कच्चा ताग मिळण्यापासून अडचणी आहेत. कापडाच्या गिरण्यांच्या बाबतींतहि कापसाच्या पुरवठ्याच्या अभावीं कांहीं ठिकाणच्या गिरण्या बंद ठेवाव्या लागत आहेत. तेव्हां नवीन यंत्रसामुग्रीमुळें सध्यांच्या परिस्थितींत उत्पादनाला चालना मिळणें संभवनीय दिसत नाहीं. मशिनरीच्या आयातीच्या बाबतींत विचाराची आणखी एक बाजू ही कीं हल्लीं मशिनरीच्या किंमती भरमसाट वाढलेल्या आहेत. दोन-तीन वर्षांतच किंमती कमी होतील. तेव्हां सध्यां वाढलेल्या बाजार भावानें मशिनरीची आयात करण्यांत काय फायदा ?

मशिनरीच्या आयातीवर खर्च करणें केव्हांहि चांगलें. परंतु अर्थशास्त्रांतील बहुतेक प्रश्नांप्रमाणें याहि प्रश्नाचा या दृष्टीनें विचार केला पाहिजे. गेल्या वर्षांत झालेल्या मशिनरीच्या आयातीमुळें उत्पादनाला खरोखर किती उत्तेजन मिळालें हा बारकाईनें चिकित्सा करण्यासारखा प्रश्न आहे. वरील विवेचनाचा सारांश हा कीं, मशिनरीच्या आयातीबद्दलहि आज आपण काळजीपूर्वक विचार केला पाहिजे.

---

इंपीरिअल बँकेचा नफा—१९४९ च्या जून ३० ला संपलेल्या सहा महिन्यांत इंपीरिअल बँकेला गेल्या वर्षीच्या ह्याच सहामाहीपेक्षा ४,१९,७०० रु अधिक नफा झाला. बँकेनें १४ टक्के नफा जाहीर केला आहे. ह्या ज्यास्त नफ्यामुळें बँकेला ५४,९६,००० रुपये पुढील वर्षांत ओढून घेता आले आहेत. एक वर्षापूर्वी ही रक्कम ४८,४६,८०० रुपये होती.

### बांठिया बँक लि, पनवेल

वरील बँकची सर्वांगीण प्रगति असंड चालू आहे, असें तिच्या ३१ डिसेंबर, १९४८ अखेरच्या ६ व्या वार्षिक अहवालावरून दिसून येते. बँकेचें वसूल भांडवल ४,७७,००० रु. असून तिचेकडे ४२,१३,५७३, रुपयांच्या ठेवी आहेत आणि बँकेचा एकूण ताळेबंद ५०,०४,०४० रुपयांचा आहे. अहवालाचे वर्षी बँकेनें बाकी ४,००० रु. ब्रँच ऑर्गनायझेशन खर्च लिहून टाकल्यावर नफा वाटणीस १७,२५२ रु. आले. त्यांतून ३,५०० रिझर्व्ह फंडांत टाकून आणि २,००० रु. इनव्हेस्टमेंट रिझर्व्हकडे वर्ग करून ३% डिव्हिडंड देण्याकडे ६,६६० रुपयांचा विनियोग करण्यांत आला. अहमदनगर येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट व लॉकर्स बसविण्यांत आले, त्यांचा स्थानिक लोकांना चांगला उपयोग होत आहे. पुणें आणि बेलापूर रोड येथेंहि अशीच व्यवस्था करण्याचें काम चालू असून प्रत्यक्ष प्रारंभ लवकरच होईल. बँकेची मुख्य कचेरी पनवेल येथें असून तिच्या मुंबई, पुणें, कल्याण, अहमदनगर, भिवंडी व बेलापूर रोड येथें शाखा आहेत. शेठ रतनचंद बांठिया हे बँकेचे चेअरमन असून शेठ बिरदिचंद भुरचंद बांठिया हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. श्री. जी. बी. साठे हे जनरल मॅनेजर व श्री. आर. पी. जोशी हे मॅनेजर आहेत.

---

### वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या उज्ज्वल इतिहासाचें आणखी एक वर्ष

वेस्टर्न इंडियानें १९४८ सालीं २,२८,२३,८५९ रुपयांचें नवें काम पुरें केलें. १९४७ सालांतील नव्या कामाची रक्कम २ कोटी, २१ लक्ष रुपये होती. इतर कित्येक सुप्रसिद्ध व सुप्रतिष्ठित कंपन्यांच्या कामांत घट येत असतांहि, वेस्टर्न इंडियाच्या कामांत १९४८ च्या प्रतिकूल परिस्थितींतहि वाढ झाली. कंपनीच्या १९४७ अखेरच्या १० व्या मूल्यमापनाप्रमाणें दर साल दर हजारी १० रु. व ८ रु. दरानें बोनस जाहीर करण्यांत आलें. हें मूल्यमापन वस्तुतः जवळ जवळ २½ टक्के दरानें झालें आहे. "भारतांत ज्या कांहीं अग्रेसर विमा कंपन्या आहेत, त्यांना सुद्धां हेवा वाटावा असा १९४७ अखेरच्या मूल्यमापनाचा अहवाल आहे" असे उद्गार त्यासंबंधीं सर श्रीराम ह्यांनीं कंपनीच्या दिल्ली येथील इमारतीचे उद्घाटन प्रसंगीं काढले आहेत. वेस्टर्न इंडियाच्या सबासिडिअरी कंपन्यांपैकी वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँड एक्झिक्यूटर कं. लि. नें अल्पावधींत चांगली प्रगति केली आहे. ट्रस्टी आणि एक्झिक्यूटर कामाच्या बाबतींत लोकांना त्याचें महत्त्व पटविण्याचें प्राथमिक उपक्रमाचें परंतु आवश्यक प्रचारकार्य तिला करावें लागत आहे. तिच्या प्रगतीमुळें एका नव्या आर्थिक व्यवस्थेचा इष्ट असा पायंडा पडणार आहे, त्याचें सामाजिक महत्त्व विशेष आहे.

---

### मासिकांच्या जोड अंकास पोष्टाची सवलत नाहीं

कित्येक मासिकें जोड अंक काढतात, म्हणजे दोन महिन्यांचे अंक एकत्र प्रसिद्ध करतात आणि पोष्टाच्या सवलतीच्या दरानें ते पाठवितात. असें करणें पोष्ट आणि टेलिग्राफ गाइडच्या ७४ (१) ह्या कलमांतील अटींचे विरुद्ध आहे. अशा जोड अंकांवर नजर ठेवून तीं सवलतीच्या दरानें स्वीकारण्यांत येऊं नयेत, अशी सूचना पोष्टमास्तर जनरलनें पोष्ट खात्यास दिली असल्याचें समजतें.

## डॉलर, पौंड व रुपया

"अर्था"च्या दि. १३ जुलैच्या अंकांतील वरील लेख वाचला. त्यांत आजची स्थिति मांडली आहे. ब्रिटनच्या आजच्या आर्थिक अरिष्टाची सुरवात युद्धकाळांत झाली; तरेंच मूळ शोधूं गेल्यास तें ब्रिटिश साम्राज्याच्या अस्तांत सांपडेल अशी माहिती माझ्या वाचनांत आली. ती मोठी उद्‌बोधक वाटते.

**प्रसंग पहिला. ( ब्रेटन वुड्स् परिषद १९४४ )**

युद्धोत्तर खुल्या व्यापाराच्या तत्त्वानुसार ब्रिटनला राहता येणार नाहीं; माल घेऊन त्याच्या बदली दुसरा माल देण्याच्या पुरातन पद्धतीचा अवलंब, जर्मनीप्रमाणें करावा लागेल, असें लॉर्ड बीवरब्रुक व चर्चिल यांनीं सांगितलें. त्यांवर मॉर्गेथ्यू व रुझवेल्ट यांचें म्हणणें असें कीं, दोस्त राष्ट्रें असें करणार असतील तर मग हिटलरचा पराभव करण्यांत विशेष अर्थ नाहीं. अखेरीस अमेरिकेनें ब्रिटनला कर्ज देण्याच्या अटीवर खुल्या व्यापाराला ब्रिटननें संमति दिली.

**प्रसंग दुसरा ( ब्रिटनला कर्ज १९४६ )**

३७,५०० लक्ष डॉलर्स प्रथम कर्ज म्हणून दिलें. आतां ही मदत समजण्यांत आल्याप्रमाणें असून कर्जाची भाषा विसरल्यासारखी झाली आहे. हें कर्ज देताना अमेरिकेनें अशी अट घातली होती कीं ब्रिटननें "स्टर्लिंग-डॉलर पुल"ची व्यवस्था रद्द करावी. तसें केल्यानें ब्रिटिश वसाहती व साम्राज्यांतर्गत देश यांना अमेरिकेबरोबर परस्पर व्यापार करतां येईल; ब्रिटनकडून डॉलर मिळण्याकरितां थांबण्याची जरूरी पडणार नाहीं.

**प्रसंग तिसरा ( मार्शल योजना )**

ब्रिटिश वसाहती व साम्राज्यांतर्गत राष्ट्रांना अमेरिकेंत परस्पर खरेदी करण्याचें स्वातंत्र्य थोडा काळ देऊन ब्रिटननें "पूल" योजना पुन्हां अंमलांत आणली. अमेरिकेनें आर्थिक मदत दिल्यास ती योजना रद्द करण्याचेंही कबूल केलें.

त्यानंतर मार्शल योजना आली. यानुसार ब्रिटनला सर्वांत जास्त रक्कम मिळत आहे.

**प्रसंग चवथा**

कर्ज, मार्शल मदत मिळूनही आजचें आर्थिक अरिष्ट ब्रिटनला भेडसावीत आहे. इतर पश्चिम युरोपियन राष्ट्रांची स्थिति कांहींशी अशीच आहे.

सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांनीं अमेरिकन मालाची खरेदी थांबविली आहे. "पूल" ची भाषा पुन्हां सुरू केली आहे. ब्रेटनवुडला १९४४ मध्यें जें ठरलें तें न करण्याचेंच जाहीर केलें आहे! मार्शल योजना अयशस्वी झाल्याचा हा दाखलाच आहे.

खरी गोष्ट ही आहे कीं, ही मंडळी उत्पन्नापेक्षां खातात जास्ती. त्यांचें हलींचें रहाणीचें मान त्यांना झेपणारें नाहीं.

आशियांतील वसाहतींच्या पिळणुकीवर ब्रिटनची श्रीमंती आधारलेली होती.

हीच स्थिति थोड्याबहुत फरकानें डच व फ्रेंच राष्ट्रांबाबत. एशिअन राष्ट्रांतील बदलत्या रंगांबरोबर या युरोपिअन राष्ट्रांना पूर्वीच्या पद्धतीनें राहणें आतां शक्य नाहीं. फ्रान्स, इंग्लंडमध्यें उत्पादन न वाढतां कामगारांचें वेतन मात्र वाढत आहे. मार्शल मदत ओतूनच मालाचा पुरवठा अमेरिकेला करावा लागत आहे. अमेरिकेच्या उत्पादन पद्धति अद्यावत आहेत; अमेरिकन कामगार अधिक उत्पादनक्षम आहे.

परदेशी मालाच्या बरोबरीनें जेव्हां माल विकतां येईनासा होतो तेव्हां वेतन आणि नफा यांत कपात करूनच उत्पादनाचा खर्च कमी करावयाचा असतो.

वेतनांत कपात करणें राजकीय कारणास्तव कठीण असतें. चलनाची हुंडणावळीची किंमत कमी केल्यानें विनायासानें तें शक्य होईल. पण तसें केल्यानें एक पौंड घेऊन बाजारांत खरेदी करावयास जाणाऱ्या ब्रिटिश कामगाराच्या हातांत पूर्वीच्या मानानें माल—वस्तू कमी येतील आणि कामगाराचें अशा रीतीनें वेतन कमी होईल. या कारणाकरितांच सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांचा पौंडाची किंमत कमी करण्यास विरोध आहे.

अन् हें खरेंच आहे कीं, पौंडाची किंमत कमी करणें हा एक मामुली, तात्कालिक, 'फर्स्ट एड' ची मलमपट्टी लावण्याचा प्रकार आहे. मूलभूत प्रश्न न सोडविल्यानें शिल्लक राहतोचः— ब्रिटन आणि पश्चिम युरोपियन देश खर्चाच्या, वापराच्या, त्यांच्या राहाणीच्या मानानें पुरेसें उत्पादन करीत नाहींत.

—संजय

## कापडावर त्यांतील धाग्यांची व "फिनिशिंग" मालाची माहिती छापा

**ऑस्ट्रेलियन सरकारचें धोरण**

ऑस्ट्रेलियांत विकल्या जाणाऱ्या कापडावर त्या कापडांत समाविष्ट असलेल्या वेगवेगळ्या धाग्यांची व "फिनिशिंग" मालाची माहिती छापण्यांत आली पाहिजे, असें बंधन घालण्याचा ऑस्ट्रेलियन सरकारचा विचार आहे. तेथील गिऱ्हाइकांची फसवणूक होऊं नये, ह्यासाठीं हा निर्बंध घालण्यांत येणार आहे. कापडाचा दर्जा वाढविण्यासाठी वेगवेगळ्या रेझीन्सचा उपयोग केला जातो. त्यामुळें कापडाचा टिकाऊपणा वाढण्यासहि मदत होऊं शकते. परंतु, कापडांत अशा 'फिलिंग'चा बराच भाग आहे, असें जाहीर केलें तर कापड कनिष्ठ दर्जाचें आहे अशी गिऱ्हाइकांची चुकीची समजूत होण्याचा संभव आहे. कित्येक कापडांत अशा "फिलिंगचें" प्रमाण शतमानानें सांगणेंहि कठीण असतें. त्याचप्रमाणें, एका विशिष्ट बाजारपेठेसाठी असा तपशील देणें आवश्यक केल्यानें, तिच्चेसाठी कापडाचा स्वतंत्र सांठा ठेवावा लागेल. वरील सर्व कारणांसाठीं, ब्रिटिश गिरणीवाल्यांनीं ऑस्ट्रेलियाच्या ह्या योजनेस विरोध दर्शविला आहे.

**अमेरिकेंत ६०% टेलिफोन**

जगांतील एकूण टेलिफोनपैकीं ६०% टेलिफोन एकट्या अमेरिकेंत आहेत.

**स्थानिक स्वराज्य संस्थांना मदत**—पुणें, सोलापूर, अहमदाबाद, सुरत आणि हुबळी ह्या नगरपालिकांना त्यांच्या नोकरांना जो महागाईभत्ता द्यावा लागतो, त्यांतील कांहीं भाग मुंबई सरकारनें देण्यासंबंधीं वाटाघाटी चालू आहेत. वरील नगरपालिका सोडून इतर नगरपालिकांना सरकार महागाई भत्त्यांच्या खर्चापैकीं ५० टक्के खर्च देत असे. त्यांच्या प्रमाणेंच आपणासही खर्च मिळावा म्हणून वरील नगरपालिकांकडून मागणी करण्यांत आली होती.

## परदेशांतील बातम्या

**चीनमधील व्यापारी पाकिस्तानांत जाणार**—चीनमध्यें कम्युनिस्टांनीं क्रांति केल्यामुळें हजारो उद्योगपती, व्यापारी, यंत्रज्ञ आणि स्थापत्यशास्त्रज्ञ ह्यापुढें चीनमध्यें राहूं इच्छित नाहींत. हे सर्व लोक पाकिस्तानांत जाण्यास खुषीनें तयार आहेत असें समजतें. ह्या चिनी लोकांना साखर, कागद, काड्याच्या पेट्या इत्यादी धंद्यांची चांगली माहिती असून त्यांना लागणारी अनुकूल परिस्थितीही पाकिस्तानांत आहे. पाकिस्तान सरकारनें परकीय भांडवलाबद्दलचें आपलें धोरण स्पष्ट केलें आणि उद्योगधंदे काढण्याविषयींची शक्याशक्यता जाहीर केली, तर हॉंककॉंगमधील बरेच चिनी उद्योगपती पाकिस्तानांत जाण्यास तयार होतील.

**कापसाचें पीक वांचविण्याची धडपड**—इजिप्तमधील कापसाच्या लागवडीखालीं असलेल्या एक शब्दांश, म्हणजे १० लाख एकर जमिनींतील, उभ्या कापसाला कीड लागण्याचा संभव निर्माण झाला आहे. कापसाच्या झाडांच्या ज्या पानावर अंडीं दिसून येत आहेत अशीं पानें खुडून टाकण्यासाठी १० लाख शाळकरी मुलें आणि सैनिक जिवाचें रान करीत आहेत. शिवाय कीड प्रतिबंधक औषधाचे फवारे उडविण्याचीं ३ हजार यंत्रेंही उपयोगांत आणलीं जात आहेत. इजिप्तमध्यें ह्या वर्षाच्या प्रारंभीं जो कडक उन्हाळा पडला त्यामुळें ही कीड पडली आहे. ह्या आपत्तीमुळें इजिप्तचें १ कोटी पौंडाचें नुकसान होईल, असा अंदाज आहे.

**ब्रिटनमधील सरकारी नौकर आणि राजकारण**—ब्रिटनमधील ६,५०,००० सरकारी नौकरांना राजकीय चळवळींत भाग घेण्याचें संपूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलें आहे ह्या स्वातंत्र्यांत पार्लमेंटच्या निवडणुकीसाठी उभे रहाण्याच्या हक्काचाही समावेश आहे. आतापर्यंत सरकारी नौकरांना राजकारणांत भाग घेण्याची फार काय पण वृत्तपत्रांतून राजकीय विषयावर पत्रें लिहिण्यासही मनाई होती. वरिष्ठ दर्जाच्या सरकारी नौकरांना मात्र नौकरीचा राजीनामा दिल्याखेरीज पार्लमेंटच्या निवडणुकीला उभें रहातां येणार नाहीं किंवा त्यांना एखाद्या राजकीय पक्षाचा कार्यकर्ता होऊन सार्वजनिक भाषणेंही करतां येणार नाहींत.

**अमेरिकेच्या अंदाजपत्रकांत तूट**—अमेरिकन सरकारचें हिशेबाचें वर्ष नुकतेंच पुरें झालें. प्रे. ट्रूमन ह्यांनीं गेल्या जानेवारींत अंदाजपत्रकाप्रमाणें जी तूट येईल म्हणून जाहीर केलें होतें, त्याच्या पेक्षा प्रत्यक्ष आलेली तूट तिप्पट आहे, असें आढळून आलें आहे. १८१·१ कोटी डॉलर्सची तूट आलेली आहे. सरकारचा खर्च ४००५·७ कोटी डॉलर्स झाला. शांततेच्या काळांत झालेल्या खर्चांचा हा सर्वांत मोठा आकडा आहे. ह्या खर्चांत परराष्ट्रांना केलेल्या मदतीचाही समावेश करण्यांत आलेला आहे. उत्पन्नानें मात्र गेल्या पांच वर्षांतील सर्वांत कमी पातळी गांठली. उत्पन्न ३८५४·६ कोटी डॉलर्सचें झालें.

**इंग्लंडमध्यें आयात होणारें जपानी कापड**—जपानमधील अमेरिकन अधिकाऱ्यांशीं विचारविनिमय करून डॉलर्सच्या हुंडणावळीबाबत स्पष्ट कल्पना आल्याखेरीज जपानमधून कापसाचे व रेशमाचे कापड आयात करण्यास परवाने द्यावयाचे नाहींत, असें ब्रिटिश सरकारनें ठरविलें आहे. गेल्या ऑक्टोबरमध्यें आयातीचे परवाने देण्यांत आल्यानंतर बरेच जपानी कापड इंग्लंडमध्यें आलें होतें. आयातीचे अधिक परवाने दिल्यास डॉलर्सच्या जाळ्यांत गुरफटण्याची भीती ब्रिटनला वाटत आहे.


उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

**ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.**

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादींसाठीं चौकशी करा:—

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : ३४५१९

**औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें**

(१) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज (ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ.)
(२) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन (ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु.)
(३) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट (ले:—. रेवि ॲले, किं. २ रु.)
(४) इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज ॲंड व्हिलेज इंडस्ट्रीज इन बॉंबे प्रॉव्हिन्स (ले.:— एल. एन. रेणु, किं. १ रु. ४ आ.)

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

शेड्यूल्ड बँक

| | |
|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. ४,३०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. २ कोटींचे वर |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. धों. कृ. साठे (चेअरमन), श्री. श्री. गो. मराठे (व्हाइस चेअरमन),
श्री. न. ग. पवार, श्री. फ. दो. पदमजी,
श्री. मा. रा. जोशी, श्री. शं. ल. किर्लोस्कर,
श्री. मा. वि. शहा, श्री. मो. रा. टमढेरे.
श्री. मा. म. गुप्ते,

★ चालू खात्यावर द. सा. द. शें. अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
★ सेव्हिंग्ज खात्यावर द. सा. द. शें. १॥ टक्का व्याज मिळतें.
★ मुदती ठेवींची रक्कम तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत स्वीकारली जाते.
★ सोलापूर येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था केली आहे.

मुख्य कचेरी: लक्ष्मी रोड, पुणें २ — सी. व्ही. जोग, मॅनेजर.

(परमांडंट लि.)

## दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरीः— ९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई
( मुंबई इलाख्याच्या १९२५ च्या ७ व्या कायद्यान्वये नोंदलेली )
स्थापन साल १९११

चेअरमनः-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. २०,३९,२०० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. २७,२१,००० |
| ठेवी | रु. ७,८९,७४,००० |
| खेळतें भांडवल | रु. ८,९७,३७,००० |

प्रांतांतील दहा जिल्ह्यांमध्यें ५३ शाखा आहेत. हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. त्यांच्या शर्तीबद्दल मुख्य कचेरीकडे चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर
शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )
पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) | श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,२८५ |

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

—महाराष्ट्रांतील—
प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था

## दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २

—आमचीं वैशिष्ट्यें—

( १ ) काटकसरीचा कारभार ( २ ) खर्चाचें अल्प प्रमाण ( ३ ) क्लेम्स तावडतोब पटविणें ( ४ ) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन ( ५ ) माफक हप्त्याचे दर.

विमा अथवा एजन्सी यासाठीं लिहा अगर भेटा.

—मॅनेजिंग डायरेक्टर

## दी बँक ऑफ औंध, लिमिटेड.

हेड ऑफिसः—१११।११२ सदाशिव पेठ, सातारा
शाखाः—औन्ध, आटपाडी, भवानीनगर व ओगलेवाडी.
मुंबई, पुणें, सांगली, सोलापूर, कऱ्हाड वगैरे
★ ठिकाणांवर ड्राफ्टस् दिले जातात.

**बचतीच्या आकर्षक योजना**

★ मुदत ठेवी आकर्षक दरानें १ ते ५ वर्षे पर्यंत स्वीकारल्या जातात.
★ सेव्हिंग बँकेत रु. १५,०००/– पर्यंत ठेव ठेवतां येते. खात्यांतून आठवड्यांतून दोनदा चेकनें रकमा काढतां येतात. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा.

बा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.

बेडेकर
लोणच्याचा
तयार मसाला

माणिक नं. 20
कपड्याकरितां उत्तम साबण
माणिक सोप वर्क्स ...कराड, (सातारा).

खून साफ करनेमें मशहूर
डॉ. वामन गोपाल का सार्सापरिला

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. न. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गानिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.